Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांवर होणारा दुरदर्शनचा परिणाम : एक अभ्यास

**प्राचार्य डॉ.निळकंठ शंकरराव पाटील,**
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय,
शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर जि. लातूर.

**प्रस्तावना :-**

आज दिवसेंदिवस मानव मोठ्या प्रमाणात प्रगती करीत आहे. विविध क्षेत्रामध्ये मानवाने प्रचंड भरारी मारली आहे आणि हे सर्व शक्य झाले आहे ते केवळ शिक्षणाने. म्हणूनच प्राचीन काळापासून ते आजतागायत शिक्षणाचे महत्व टिकून आहे. केवळ शिक्षणानेच मानवाने जी विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. त्यात प्रामुख्याने तंत्रज्ञान हा मोलाचाच दगड मानावे लागेल. तंत्रज्ञान हे जसे उपयोगी आहे तसेच त्याचे दोषही आहेत. अलिकडच्या काळात तंत्रज्ञान हे घरोघरी पोहचले आहे. त्यात टि.व्ही., मोबाईल, सारख्या वस्तू नसणार घर सुध्दा आज आपणास शोधून ही सापडणार नाही. आज घरोघरी दुरदर्शन आले त्यातील वेगवेगळ्या उपक्रमांनी लहानपणापासून ते वृध्दापर्यंत लोकांना वेड लावले आहे. एक वेळ जेवण नसेल तरी चालेल पण टि.व्ही. वरची मालिका आजच्या महिला चुकू देत नाहीत. याच वेळी घरात लहान मुले असतात. व ते अनुकरण प्रिय असल्यामुळे आपोआपच त्यांनाही घरातील माणसामुळे टि.व्ही. चे धडे मिळतात. शिवाय लहान मुलांना रोचक असे कार्यक्रम टि.व्ही. वर येत असल्यामुळे लहान मुलेही त्यात रंगून जात आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणजे त्या लहान मुलांच्या शिक्षणाकडे दिवसेंदिवस दुर्लक्ष होत आहे. व त्यांना सांगण्यासाठी आजच्या पालकाकडे वेळही नाही आणि म्हणून असे विद्यार्थी अभ्यासात मागे पडत असल्याचे दिसत आहे. म्हणूनच क्षमता असुनही टि.व्ही. मुळे अभ्यासात मागे राहणा-या विद्यार्थ्यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**संशोधनाची गरज व महत्व :-**

१. दुरदर्शन हा विद्यार्थ्यांवर परिणाम करणारा एक महत्वाचा घटक आहे. त्याचा आपणास सकारात्मक उपयोग करुन घेण्यासाठी संशोधन महत्वाचे आहे.
२. या वयातील मुलांची मने संस्कारक्षम असल्यामुळे योग्य संस्कार रुजविण्यासाठी सदरील संशोधन गरजेचे आहे.
३. दुरदर्शन मुळे मुलांवर होणारे वाईट परिणाम कमी करण्यासाठी सदरील संशोधनाची गरज आहे.
४. विद्यार्थ्यांच्या मुळ क्षमता विकसीत करण्यासाठी सदरील संशोधन महत्वाचे आहे.
५. विद्यार्थी-पालक व शिक्षक यांच्या मध्ये योग्य समन्वय ठेवण्यासाठी सदरील संशोधन गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. विद्यार्थ्यांवर दुरदर्शनचा होणारा परिणाम याचा अभ्यास करणे.
२. दुरदर्शनाकडे मुले आकर्षित होणा-या कारणांचा शोध घेणे.
३. विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे वळविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :**

१. विद्यार्थी दुरदर्शन वरील विविध कार्यक्रम पाहतात.
२. दुरदर्शनचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो.

**परिकल्पना :-**

**व्याप्ती व मर्यादा :-**

१. सदरील संशोधनासाठी फक्त प्राथमिक स्तर विचारात घेतला आहे.
२. शाळा : स्वामी विवेकानंद विद्यालयापुरतीच व्याप्ती आहे.
३. वर्ष : सदरील संशोधनास सन २०१८-१९ वर्षाची मर्यादा आहे.
४. क्षेत्र : सदरील संशोधनासाठी अहमदपूर तालूक्याचाच विचार केला आहे.

**संशोधन पध्दत :-**

सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.

**न्यादर्श :-**

सदरील संशोधनासाठी न्यादर्श निवडीसाठी यादृच्छिक पध्दतीतील लॉटरी पध्दतीची वापर केला आहे.

**माहिती संकलानाची साधने :-**

१. प्रश्नावली (पालक)

२. निरीक्षण

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

१) पाल्यासोबत टि.व्ही. पाहणे प्रतिसाद :

होय : ९० टक्के नाही : १० टक्के

२) पालक पाहत असणा-या कार्यक्रमाचा प्रतिसाद :

| मालिका | चित्रपट | क्रिकेट | बातम्या |
|---|---|---|---|
| १०० | १०० | ६० | १०० |

३) टि.व्ही. वर पालक पाहत असलेले कार्यक्रम :

**मालिका चित्रपट संगीत, विज्ञान विषयक**

४) टि.व्ही. वरील शैक्षणिक कार्यक्रम :

होय : ८५ टक्के नाही : १५ टक्के

५) पाल्याचा अभ्यास करुन घेणे बाबत प्रतिसाद :

होय : ९० टक्के नाही : १० टक्के

६) पाल्याच्या सुट्टीच्या दिवशी अभ्यासाचा प्रतिसाद :

होय १०० टक्के नाही : ० टक्के

७) घरकामात पाल्याचे सहकार्य :

होय : १०० टक्के नाही : ० टक्के

८) पाल्याच्या टि.व्ही. वरील अनुकरणाचा प्रतिसाद :

होय : ९० टक्के नाही : १० टक्के

९) पाल्याच्या गल्लीतील/घरातील तक्रारीचा प्रतिसाद :

होय : ३५ टक्के नाही : ६५ टक्के

१०) कार्यक्रम पाहण्यावरुन पालक व पाल्यातील तक्रारीचा प्रतिसाद : होय : ७० टक्के नाही : ३० टक्के

११) टि.व्ही. पाहण्यावरून पालक व पाल्यातील तक्रारीचा प्रतिसाद : होय : ६० टक्के नाही : ४० टक्के

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत संशोधनातून पुढिल निष्कर्ष निघाले.

१. टि.व्ही. वरील कार्यक्रम पाहण्यासाठी विद्यार्थी मध्यांतरामध्ये पळुन जातात.
२. टि.व्ही. वर आवडीचा कार्यक्रम असलेल्या दिवशी मुले गैरहजर राहतात.
३. टि.व्ही. मुळे विद्यार्थ्याच्या अभ्यासावर प्रतिकुल परिणाम होतो.
४. टि.व्ही. वरील कलाकारांचा ८० टक्के मुलांवर पगडा आहे.
५. टि.व्ही. वरील कलाकारांचे अनुकरण ७५ टक्के पेक्षा जास्त मुले करतात.
६. टि.व्ही. कडे मुले आकर्षित होण्याचे मुख्य कारण म्हणजे

अ) मुलांच्या आवडीचे कार्यक्रम व त्यांच्या भावनिकतेला हात घालणारे कार्यक्रम

ब) पालक विशेषत : घरातील महिला वर्ग जास्त टि.व्ही. पाहत असल्याने मुले त्याचेच अनुकरण करतात.

**उपाय :-**

१) टि.व्ही.चा सकारात्मक परिणाम घडविणारेच कार्यक्रम घरात टि.व्ही. वर लावावेत.

२) पालकांनी मुलांसमोर टि.व्ही. पाहणे टाळणे.

३) पालकामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी शाळेत ८/१५ दिवसांनी कार्यक्रम आयोजित करावा.

**शिफारशी :-**

१) शिक्षक-पालक-विद्यार्थी योग्य समन्वय ठेवावा.

२) पालकांनी मुलांसमोर टि.व्ही. पाहू नये.

३) पाल्यामध्ये अभ्यासाची गोडी निर्माण करावी.

४) पाल्यांना भावनिकतेने हाताळावे.

**पुढिल संशोधनासाठी विषय :-**

१) विद्यार्थ्या वरील टि.व्ही. चा अनुकुल परिणात अभ्यासणे.

२) मोबाईल सारख्या तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संदर्भ सुची :-**

१) पारसनिस न.रा. (१९९३) शिक्षकाचे प्रशिक्षण, पुणे, नुतन प्रकाशन.

२) मुळे रा.श.आणि उमाटे वि.तु. ,संशोधनाची मुलतत्वे.

३) शेटकार गणेश आणि जोशी शोभाना, (२००७) शैक्षणिक मुल्यमापन व कृतिसंशोधन , ओरंगाबाद, मृण्मयी प्रकाशन.

४) देशमुख रा.प. (२००५) मुलभूत सांख्यिकी, नागपूर, विद्या प्रकाशन.

५) उपासनी ना.के., आणि कुलकर्णी के.व्ही., (१९९६), नवे शैक्षणिक मुल्यमापन आणि संख्याशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन.